THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 5TH OCTOBER 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

नंबर १२१२.

### हिंदुस्थान सरकार.

### होम डिपार्टमेंट.

**पब्लिक.**

मुक्काम सिमला, तारीख ३१ माहे आगस्ट सन १८९३.

### जाहीरनामा.

**मलिका माआझमा कैसरे हिंद यांचें पुढील पत्र तारीख ११ जुलै सन १८९३ च्या लंडन गॅझेटाच्या पुरवणींत छापून प्रसिद्ध झालें आहे, तें सर्व लोकांस जाहीर होण्याकरितां पुनः प्रसिद्ध करण्यांत येत आहेः—**

"मुक्काम व्हाइट हाल, तारीख १० माहे जुलै सन १८९३.

**राणीसाहेबांचें पुढील पत्र नेक नामदार सेक्रेटरी आफ् स्टेट, होम डिपार्टमेंट, यांजकडे आलें आहेः—**

मुक्काम विंड्सर कासल, तारीख १० माहे जुलै सन १८९३.

आमचे प्रियकर नातू, शाहाजादे ड्यूक आफ् यार्क आणि त्यांची प्रिय वधू शाहाजादी व्हिक्टोरिया मे आफ् टेक, यांच्या विवाहसमयीं आमच्या प्रजाजनांकडून, आमच्या स्वतांच्या व आमच्या घराण्याच्या संबंधानें मोठी राजभक्ति व प्रेम हीं चित्तवेधक रीतीनें दाखविण्यांत आलीं तें पाहून आमच्या मनास मोठें समाधान वाटलें व आमचें अंतःकरण सद्गदित झालें, हें पुनः एकवार आमच्या प्रजाजनास आह्मी कळवितों.

वास्तविक पाहतां, यांत कांहीं नवीन प्रकार झाला असें आह्मांस वाटत नाहीं, कारण आमच्या सुखदुःखाच्या सर्व प्रसंगीं अशाच प्रकारें प्रजाजनांकडून सुखदुःखाचे उद्गार अंतःकरणपूर्वक निघालेले असून, ती गोष्ट आह्मांस पूर्णपणें अवगत आहे.

तसेंच, आमच्या विस्तीर्ण राज्यांतील प्रजाजनांच्या आनंदाच्या प्रसंगीं आमच्या मनास किती आनंद होतो व त्यांच्या दुःखाच्या प्रसंगीं आमच्या अंतःकरणांत कसा कळवळा उत्पन्न होतो, हें त्यांस माहीत आहे हें आह्मी जाणत आहों, आणि आह्मां उभयतांमध्यें असा ऐक्यभाव असणें यांतच राज्याची खरी मजबुदी आहे हेंही आह्मांस अवगत आहे.

शेवटीं, ज्याप्रमाणें आमच्या प्रजाजनांनीं आमच्या प्रिय नातवंडांच्या कल्याणासाठीं व सुखासाठीं आपली इच्छा प्रदर्शित करून त्याविषयीं ईश्वरापाशीं अनन्यभावें प्रार्थना केली आहे, त्याचप्रमाणें आमचीही इच्छा असून आह्मी तशीच त्यापाशीं प्रार्थना करितों.

व्हिक्टोरिया, आर्. आय्."

सी. जे. लायल,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS